# शाळा अनुदान

शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था,अनुदानित शाळांना प्राथमिक शाळेस रु ५०००/- उच्च प्राथमिक शाळेस रु ७०००/- याप्रमाणे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

उदिदष्टये- १) शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या साहित्याची दुरुस्ती करणे किंवा नवीन साहित्य खरेदी करणे.

२) खेळाचे साहित्य ,खेळ /क्रीडा साधने खरेदी करणे.

३) विज्ञान प्रयोगशाळा साहित्य आणि संगणक शिक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी शैक्षणिक सी.डी.खरेदी करणे

४) शाळेत बालस्नेही वातावरण निर्माण करणे.

५) वृत्तपत्र व संदर्भिय साहित्य वाचनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणे.

# शाळा देखभाल दुरुस्ती अनुदान

**शाळा देखभाल दुरुस्ती अनुदान** - सदरचे अनुदान शासकीय,स्थानिक स्वराज्य संस्थाकडील प्राथमिक शाळेत वापरात असलेल्या तीन वर्गखोल्यासाठी रु ५०००/- व वापरात असलेल्या तीन पेक्षा जास्त वर्गखोल्यासाठी रु १००००/- प्रमाणे वितरीत करण्यात येणार आहे.

उदिदष्टये-

१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत देखभाल दुरुस्ती अनुदानाचा उपयोग शाळेच्या अंतरंग व बाहयरंग,तसेच शाळेभोवतालचा परिसर व शाळेच्या किरकोळ दुरस्ती कामी करण्यात यावा.

२) शिक्षण हक्क कायदयातील तरतूदीच्या अनुषंगाने प्रत्येक शाळा बालस्नेही असणे आवश्यक आहे.त्या अनुषंगाने शाळेत बालस्नेही वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींसाठी देखभाल दुरुस्ती अनुदानाचा उपयोग करण्यात यावा.प्रत्येक शाळेने आपली शाळा बालस्नेही करण्याबाबतचे नियोजन या सोबत करुया शाळा बालस्नेही -कृतीपत्रिका यासोबत जोडण्यात आली आहे.त्यानुसार क्षेत्रनिहाय कार्यक्रम शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत सादर करण्यात यावा.याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा केंद्रप्रमुख,विस्तारअधिकारी यांनी दरमहिन्यास घ्यावा.

३) देखभाल दुरुस्ती अनुदानातून स्वच्छतागृहे कार्यान्वित करणे,संगणकाची किरकोळ दुरुस्ती करणे ,वीज बील भरणा करणे,वीजेची उपकरणे इ.कामे करावीत.